**पवित्र पोर्टल मार्फत खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील मुलाखतीसह शिक्षक निवडीसाठी व्यवस्थापन व मुलाखतीसाठी निवडपात्र उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना (दिनांक २/९/२०२१)**

**अ) सर्वसाधारण सूचना :**

१. शिक्षण सेवक पदभरतीसाठी माहे २२/२/२०१९ ते ९/३/२०१९ या कालावधीमध्ये व्यवस्थापनांमार्फत बिंदुनामावली व रिक्त पदांची माहितीची नोंद करुन पवित्र पोर्टलवर काही व्यवस्थापनांनी वृतपत्रामध्ये जाहिराती प्रसिध्द केलेल्या आहेत.

२. सदर जाहिरातीस अनुसरुन उमेदवारांनी स्व-प्रमाणित केलेल्या माहितीच्या आधारे पात्र उमेदवारांना माहे जून २०१९ मध्ये विविध व्यवस्थापनामधील रिक्त पदांकरीता त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार मुलाखतीशिवाय व मुलाखतीसह या प्रकारामध्ये प्राधान्यक्रम उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

३. तसेच याचिका क्र ४०७९/२०१९ मधील आदेशानुसार माध्यमिक स्तरावरील पदांसाठी किमान उत्तीर्ण व उच्च माध्यमिक स्तरावरील पदांसाठी किमान द्वितीय श्रेणी असणा-या व वयाधिक असणा-या उमेदवारांकडून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील पदासाठी प्राधान्यक्रम घेण्यात आलेले आहेत.

४. ज्या व्यवस्थापनांनी पवित्र पोर्टलवर शिक्षक भरतीसाठी मुलाखतीसह शिक्षक पदभरती हा विकल्प निवडलेला आहे त्या व्यवस्थापनांनी या सर्व सूचनांचे पालन करुन निवडीची मार्गदर्शक कार्यपध्दती अनुसरावयाची आहे.

५. उमेदवारांसाठी यापूर्वी दिनांक १९/६/२०१९ रोजी पवित्र पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेल्या सूचनांचे व्यवस्थापन/उमेदवारांनी अवलोकन करणे अनिवार्य आहे. सदर सूचना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

६. मुलाखतीसह शिक्षक पदभरती हा विकल्प निवडलेल्या व्यवस्थापनांना निवडपात्र उमेदवाराची शिफारस करते वेळी उमेदवारास अभियोग्यता व बुध्दिमता चाचणीतील प्राप्त गुण, बिंदुनामावली (समांतर आरक्षणासह),जाहिरातीतील विषय, उमेदवारांनी स्व-प्रमाणपत्रामध्ये

नमूद केलेली माहिती व दिलेले प्राधान्यक्रम इत्यादी बाबींचा एकत्रित विचार करुन गुणवत्तेनुसार व्यवस्थापनास उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

७. वरील क्र. ६ मधील बाबी विचारात घेता एका उमेदवारास जास्तीत जास्त १० प्राधान्यक्रमावर गुणवत्तेनुसार मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी शिफारस करण्यात आलेली आहे.

८. प्रत्येक रिक्त जागेकरीता उपलब्धतेनुसार १:१० (समांतर आरक्षणासह) या जास्तीत जास्त गुणोत्तराप्रमाणे मुलाखत व अध्यापन कौशल्याद्वारे निवडीसाठी शिफारस पात्र उमेदवारांची यादी तयार करण्यात आलेली आहे. सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रत्येक व्यवस्थापनाच्या लॉगीनवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच उमेदवारांच्या लॉगीनवर प्राधान्यक्रमानुसार पात्र ठरलेल्या व्यवस्थापनाची यादी देण्यात आलेली आहे.

९. पवित्र पोर्टलवर उमेदवारांकडून कोणतीही कागदपत्र/प्रमाणपत्र (उदा.शैक्षणिक,व्यावसायिक अर्हता,जातीचा दाखला,जात पडताळणी प्रमाणपत्र,समांतर आरक्षण विषयक प्रमाणपत्र इत्यादी) अपलोड करुन घेण्यात आलेली नाही. उमेदवाराने पोर्टलवरील स्वप्रमाणत्रामध्ये नोंद केलेल्या माहितीच्या आधारे संबंधित व्यवस्थापनाकडे अभियोग्यता व बुध्दिमता चाचणीतील (TAIT) गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवडपात्र उमेदवारांची शिफारस करण्यात आलेली आहे.ही अंतीम निवड यादी नसून मुलाखतीसाठी शिफारसपात्र यादी आहे. मुलाखतीनंतर व्यवस्थापनाकडून प्रसिध्द होणारी यादी अंतीम निवड यादी असेल.

१०.उमेदवाराच्या निवडीपूर्वी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता तसेच स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या मूळ कागदपत्र/प्रमाणपत्राची तपासणी शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.सीईटी-२०१५/प्रक्र १४९/टीएनटी-१ दिनांक ७/२/२०१९ मधील मुद्दा क्र. १० मध्ये नमूद केल्यानुसार महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती नियमावली १९८१ नुसार गठीत केलेल्या शाळा समितीमार्फत करावी.

११. निवडपात्र उमदेवारांनी पवित्र पोर्टलवर स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची तपासणी त्या त्या व्यवस्थापनाने करुन मुलाखत व अध्यापन कौशल्याबाबतची कार्यवाही करावी.

१२. मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी शिफारस केलेल्या उमेदवारांचे स्व-प्रमाणपत्र व्यवस्थापनाच्या लॉगीनवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.सदर स्व-प्रमाणपत्रामध्ये उमेदवारांचा संपर्काचा तपाशिल जसे ईमेल आयडी,मोबाईल क्रमांक इत्यादी बाबी नमुद आहेत.

१३. उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापूर्वी व्यवस्थापनाने संबंधित उमदेवारांचे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचे मूळ कागदपत्र/प्रमाणपत्र, आरक्षणाबाबत (समांतर आरक्षणासह) जात वैधता प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्राची तपासणी करुनच नियुक्तीबाबतची कार्यवाही करावी. अपात्र उमेदवारांची नियुक्ती व्यवस्थापनाने केल्यास त्यास सर्वस्वी व्यवस्थापन जबाबदार राहील व अशा अपात्र उमेदवारांना शासनाकडून कोणतेही अनुदान देय राहणार नाही, याची जबाबदारी व्यवस्थापनावर निश्चित होईल.

१४. ज्या व्यवस्थापनाच्या जाहिरातीध्ये अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) या प्रवर्गातील रिक्त जागा असतील, अशा व्यवस्थापनांनी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे अधिवास, जिल्हयातील पेसा क्षेत्रांतर्गत असल्याची खात्री करुन पात्र असणा-यां उमेदवारांचा अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) या प्रवर्गाच्या निवडीसाठी विचार करावा.

१५. खाजगी व्यवस्थापनांना पवित्र पोर्टलमार्फत पुरविण्यात आलेल्या निवडपात्र सूचीतील उमेदवारांची मुलाखत घेण्याचे व अध्यापन कौशल्य तपासण्याचे स्वातंत्र्य आहे.

१६. शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारक उमेदवारांनी खाजगी व्यवस्थापनाच्या जाहिरातीनुसार रिक्त जागांसाठी प्राधान्यक्रम दिलेले आहेत. या उमेदवारांचे शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमता चाचणीतील (TAIT) प्राप्त गुण, अध्यापनाचे उपलब्ध विषय, आरक्षण, दिलेले प्राधान्यक्रम इत्यादी बाबी एकत्रित विचारात घेवून प्रत्येक रिक्त जागेकरीता उपलब्धतेनुसार जास्तीजास्त

१:१० (समांतर आरक्षणासह) या गुणोत्तराप्रमाणे मुलाखत व अध्यापन कौशल्याव्दारे नियुक्तीसाठी उमेदवारांची यादी व्यवस्थापनाच्या लॉगीनवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर यादी शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमता चाचणी परीक्षेतील (TAIT) गुणवत्तेनुसार करण्यात आलेली आहे.

१७. पोर्टल मार्फत उमेदवारांची मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी शिफारस करताना व्यवस्थापनाच्या जाहिरातीतील आरक्षण, समांतर आरक्षण व अध्यापनाचे गटनिहाय (इ.६वी ते इ.८वी, इ.९वी ते इ.१०वी व इ.११वी ते इ.१२वी) विषय याबाबी एकत्रित विचारात घेवून शिफारस करण्यात आलेली आहे. पोर्टल मार्फत शिफारस केलेले आरक्षण व विषय याबाबी विचारात घेवून उमेदवारांची अंतीम निवड करावी. या निवडपात्र उमेदवारांचा गट, विषय, व प्रवर्ग इत्यादी यामध्ये व्यवस्थापनाच्या स्तरावर बदल करता येणार नाही.

**तथापि मुलाखतीसाठी यादी तयार करताना आरक्षीत प्रवर्गातील उमेदवार खुला गटातील पदासाठी गुणवत्तेनुसार पात्र ठरत असल्यास अशा उमेदवारांना त्यांच्या मुळ प्रवर्गाऐवजी खुला प्रवर्गातून विचारात घेण्यात आलेले आहे. मुलाखत व अध्यापन कौशल्यानंतर अंतीम निवडीच्या वेळी सदर उमेदवार खुला प्रवर्गासाठी गुणानुक्रमे पात्र ठरत नसल्यास अशा उमेदवारांचा त्यांच्या मूळ प्रवर्गात देखील (जाहिरातीमध्ये मूळ प्रवर्गाच्या जागा रिक्त असल्यास) गुणवत्तेनुसार नियुक्तीसाठी विचार करता येईल.**

१८. पोर्टलवर उमेदवारांनी नोंद केलेल्या माहितीनुसार मुलाखतीसाठी शिफारस पात्र उमेदवारांची यादी व्यवस्थापनाच्या लॉगीनवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यामध्ये उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी व विषयनिहाय उमेदवारांची यादी अशा स्वतंत्र दोन यादयांचा समावेश असेल.

१९. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र सीईटी-२०१५/प्रक्र १४९/टीएनटी-१, दि.७/२/२०१९ अन्वये उमेदवाराची मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी एकूण **३०** गुण असतील.

२०. मुलाखत व अध्यापन कौशल्याद्वारे संबंधित व्यवस्थापन उमेदवारांचे गुणपत्रक व निकाल पवित्र पोर्टलवर जाहीर करतील. त्या प्रमाणे मुलाखतीस उपस्थित राहिलेल्या सर्व उमदेवारांना देखील व्यक्तीशः कळविण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची राहील.

२१. मुलाखत व अध्यापन कौशल्यावर आधारित गुणांनुसार नियुक्तीस निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती ७ कार्यालयीन दिवसांत संबंधित व्यवस्थापन करेल. उमेदवारांचे नियुक्ती आदेश संबंधित व्यवस्थापन ई-मेलद्वारे संबंधित उमेदवार व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), विभागीय शिक्षण उपसंचालक यांना पाठवेल. तसेच नियुक्ती आदेशाची मूळ प्रत संबंधितांना रजिस्टर्ड स्पीड पोष्टद्वारे पाठवेल. अंतीम निवड झालेल्या उमेदवारांचा 'Selected' व उर्वरित उमेदवारांचा 'Waitlisted /Absent /Rejected' या प्रकारामध्ये अंतीम निर्णय व्यवस्थापनाच्या लॉगीनला प्रसिध्द करावा लागेल.

२२. कोणत्याही व्यवस्थापनाला पदभरतीसाठी उमेदवारांकडून कोणतेही अर्ज शुल्क/फी आकारता येणार नाही.

२३. या पदभरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ब) मुलाखतीस उपस्थित राहणा-या उमेदवारांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता :-**

इयत्ता १ली ते इयता ५वी, इ ६वी ते इ ८ वी यासाठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र संकिर्ण-२०१८/प्रक्र ३९७/टीएनटी-१ दिनांक ७/२/२०१९, दिनांक २५/२/२०१९, दि. १६/५/२०१९ व दि.१२/६/२०१९ च्या शुध्दिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार राहील.

**शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता खालील प्रमाणे**

**१. इयता ६वी ते इ ८वी :**

**शैक्षणिक अर्हता :** संबंधित विषय गटातील पदवी (पदवीच्या अंतीम वर्षी खुल्या प्रवर्गासाठी ४५ टक्के गुणांसह व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४० टक्के गुणांसह) व

**व्यावसायिक अर्हता :** D.Ed/D.El.Ed//D.T.Ed./D.Ed(Special Education)/TCH

OR

B.Ed/B.A.Ed/B.Sc.Ed.

आणि

TET-Paper-2 or CTET- Paper-2 उत्तीर्ण.

**माध्यम :** उच्च माध्यमिक परीक्षा,पदवी व डीएड/बीएड स्तरावर ज्या ज्या माध्यमातून शिक्षण घेतले असेल त्या त्या माध्यमासाठी उमेदवार पात्र राहील.

**२. इयत्ता ९वी ते इ १०वी :**

**शैक्षणिक अर्हता :** संबंधित विषय गटातील पदवी. व

**व्यावसायिक अर्हता :** B.Ed/B.P.Ed (For Physical Education subject Post)/B.A.Ed/B.Sc.Ed.

**माध्यम :** उच्च माध्यमिक परीक्षा,पदवी व बीएड/बिपीएड (शारिरिक शिक्षण या विषयासाठीच्या पदासाठी) स्तरावर ज्या ज्या माध्यमातून शिक्षण घेतले असेल त्या त्या माध्यमासाठी उमेदवार पात्र राहील.

**३. इयत्ता ११ वी ते इ १२ वी :**

**शैक्षणिक अर्हता :** संबंधित विषय गटातील पदव्युतर पदवी (किमान द्वितीय श्रेणीसह उतीर्ण) व

**व्यावसायिक अर्हता :** B.Ed/B.P.Ed (For Physical Education subject Post)/B.A.Ed/B.Sc.Ed.

**माध्यम :** पदवी,पदव्युतर पदवी व बीएड/बिपीएड (शारिरिक शिक्षण या विषयासाठीच्या पदासाठी) स्तरावर ज्या ज्या माध्यमातून शिक्षण घेतले असेल त्या त्या माध्यमासाठी उमेदवार पात्र राहील.

याचिका क्र ४०७९/२०१९ मधील आदेशानुसार उच्च माध्यमिक पदासाठी पदव्युतर पदवीमध्ये किमान द्वितीय श्रेणी उत्तीर्ण अशी अट नमूद करण्यात आलेली आहे,त्यामुळे उमेदवारांकडून द्वितीय श्रेणी असल्याची माहिती नव्याने घेण्यात आलेली आहे. पदव्युतर पदवी मध्ये ५० टक्के पेक्षा कमी गुण असणा-या सर्वच उमेदवारांकडून द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण आहे किंवा नाही याबाबतची माहिती घेण्यात आलेली आहे. उमेदवारांनी पोर्टल वर नमूद केलेल्या माहिती नुसार गुणवतेनुसार अशा उमेदवारांची शिफारस झालेली आहे. त्यामुळे कागदपत्र पडताळणी करताना उच्च माध्यमिक पदासाठी पदव्युतर पदवी प्रमाणपत्र तपासताना उमेदवार किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असल्याची खात्री करावी.

वरील सर्व गटासाठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता,अभियोग्यता व बुध्दिमता चाचणी परीक्षेस अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक २२/११/२०१७ पूर्वी धारण करणे आवश्यक आहे.

**क) उमेदवारांची वयोमर्यादा :-**

१. खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांतील पदांकरिता उमेदवारांची वयोमर्यादा महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील ९(४) ब अन्वये प्राथमिक शाळेशिवाय इतर कोणत्याही शाळेत कोणत्याही पदावर नियुक्ती करताना उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

२. इयता १ ली ते इ ८वी या वर्गाकरिता शिक्षण सेवक पदाकरिता बालकांचा सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार शासनाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार किमान व कमाल वयोमर्यादा लागू राहील. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय

क्र सीईटी-२०१५/प्रक्र १४९/टिएनटी-१ दिनांक २३/६/२०१७ अन्वये शिक्षण सेवक पदासाठी वयोमर्यादा लागू राहील.

३. नियुक्ती करतेवेळी उमेदवारांचे दिनांक २२/११/२०१७ रोजीचे वय ग्राहय धरावे.

**ड) निवडीची कार्यपध्दती**

१. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथील याचिका क्र ५०५९/२०१७ मध्ये दिनांक २१/११/२०१८ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित केले आहेत.

   a) The Validity of Rules 6(2) and (3) and 9 (2A) and (2B) of the MEPS Rules, introduced on 22/6/2017, is upheld on the touchstone of competency of the State Government and Article 19(1) (g) of the Constitution of India.

   b) The procedure for selection and appointment of the teachers in the private schools, receiving or eligible to receive full or partial grant-in-aid from the State exchequer, shall be governed by provisions of Rule 6(1),(2) & (3) read with Rule 9 (2A) and (2B) of MEPS Rules, as are interpreted by us in paras 34,36,39 and 44 of this judgment without interfering with the right of the Management and/ of the School Committee to select and appoint the qualified, eligible and suitable candidate by holding the personal interview.

२. पवित्र प्रणालीतील स्वप्रमाणपत्रामध्ये उमेदवाराने नोंद केलेल्या माहितीच्या आधारे (आरक्षण प्रवर्ग, समांतर आरक्षण, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता इत्यादी) संस्थेने दिलेल्या जाहितीरातीतील रिक्त पदानुसार गुणानुक्रमे जास्तीजास्त १:१० या मर्यादेत (समांतर आरक्षणासह व उमेदवार उपलब्धतेच्या मर्यादेत) मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी उमेदवार उपलब्ध करुन दिलेले आहेत.

३. उपरोक्त अ.क्र. २ मध्ये नमुद केल्यानुसार १:१० या प्रमाणाच्या मर्यादेत, उमेदवारांचे “अभियोग्यता व बुध्दिमता चाचणी” परीक्षेतील (TAIT) गुण, उमेदवारांने दिलेला

प्राधान्यक्रम, माध्यम, विषय आरक्षण, समांतर आरक्षण इत्यादींचा एकत्रित विचार केलेला आहे.

४. **वरील अ.क्र. २ व ३ मधील बाबी विचारात घेवून उमेदवार मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी निवडला गेला आहे. त्यामुळे व्यवस्थापनस्तरावर या उमेदवाराचा गट, विषय व प्रवर्ग इत्यादी यामध्ये बदल करता येणार नाही.**

**तथापि मुलाखतीसाठी यादी तयार करताना आरक्षीत प्रवर्गातील उमेदवार खुला गटातील पदासाठी गुणवत्तेनुसार पात्र ठरत असल्यास अशा उमेदवारांना त्यांच्या मुळ प्रवर्गाऐवजी खुला प्रवर्गातून विचारात घेण्यात आलेले आहे. मुलाखत व अध्यापन कौशल्यानंतर अंतीम निवडीच्या वेळी सदर उमेदवार खुला प्रवर्गासाठी गुणानुक्रमे पात्र ठरत नसल्यास अशा उमेदवारांचा त्यांच्या मूळ प्रवर्गात देखील (जाहिरातीमध्ये मूळ प्रवर्गाच्या जागा रिक्त असल्यास) गुणवत्तेनुसार नियुक्तीसाठी विचार करता येईल.**

५. उमेदवाराच्या मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी एकुण ३० गुण असतील. उमेदवारांची अंतिम निवड या ३० गुणांच्या आधारे करण्यात येईल.

६. मुलाखत व अध्यापन कौशल्यामध्ये उमेदवारांना समान गुण प्राप्त झाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२/१२/२०१७ रोजीच्या शासन पुरक पत्रानुसार गुणानुक्रमे यादी तयार करण्यासाठी पुढील कार्यवाही करावी.

**अ)** मुलाखत व अध्यापन कौशल्यामध्ये समान गुण असल्यास **आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास** प्रथम प्राधान्य द्यावे.

**ब)** समान गुण प्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य नसेल अथवा वरील (अ) नुसार एका पेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त असतील तर त्या पैकी **वयाने जेष्ठ** असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

**क)** वरील अ क्र (अ) व (ब) या दोन्ही अटीमध्ये देखील समान गुण ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत अर्ज सादर करण्याच्या **अंतिम दिनांकास** (म्हणजेच दिनांक २२/११/२०१७) **उच्चतर शैक्षणिक अर्हता** (उदा.पदव्युतर पदवीधर,पदवीधर,उच्च माध्यमिक शालांत परीक्षा,माध्यमिक शालांत परीक्षा उतीर्ण अशा प्रकारे) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

**ड)** वरील अ क्र (अ),(ब) व (क) या तिन्ही अटीमध्ये देखील समान गुण ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या **शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त** उमेदवारांस प्राधान्य देण्यात यावे.

७. व्यवस्थापनाकडून संबंधित उमेदवारांची मुलाखत व अध्यापन कौशल्याद्वारे उच्चत्तम गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांची रिक्त पदावर नियुक्ती करण्यात येईल. मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी उपस्थित राहणाऱ्या सर्व उमेदवारांची व्यवस्थापन गुणानुक्रमे यादी तयार करुन पवित्र पोर्टलवरील व्यवस्थापनाच्या लॉगीनवर विहित मुदतीत गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. याबाबतच्या सूचना पोर्टलवर देण्यात येतील.

८. व्यवस्थापनाने निवड केलेल्या उमेदवारास नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ कार्यालयीन दिवसांमध्ये हजर व्हावे लागेल, उक्त कालावधीमध्ये उमेदवार हजर न झाल्यास व्यवस्थापन गुणानुक्रमे पुढील उमेदवाराची निवड करेल. निवडलेल्या प्रत्येक उमेदवारास हजर होण्यासाठी कमाल ७ कार्यालयीन दिवसांची मर्यादा असेल.

९. मुलाखतीसह शिक्षक पदभरती प्रक्रियेसाठी एका जागेसाठी जास्तीजास्त १:१० या प्रमाणात उमेदवार मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी निवडले जाणार आहेत. यामधील नियुक्ती आदेश दिलेला उमेदवार विहित कालावधीमध्ये कोणत्याही कारणामुळे रुजू न होणे, कागदपत्र तपासणीमध्ये अपात्र ठरणे इत्यादी कारणामुळे रिक्त राहिलेल्या पदावर व्यवस्थापन गुणानुक्रमे पुढील उमेदवाराची निवड करेल. **परंतु असे करताना वरील**

**अ.क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करुन पुढील उमेदवारांना विचारात घ्यावे लागेल.**

**१०. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथील याचिका क्र. ५०५९/२०१७ मध्ये दिनांक २१/११/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासन निर्णय दिनांक ७/२/२०१९ अन्वये संस्थेकडे प्राप्त झालेल्या यादीतील (TAIT) परीक्षेतील उच्च गुण नसणा-या उमेदवाराची निवड करावयाची झाल्यास शाळा समितीस लिखित कारणे नमुद करावी लागतील. तसेच (TAIT) परीक्षेतील कमी गुण असलेल्या उमेदवाराची निवड होत असल्यास अंतिम निकालामध्ये तशी कारणे स्पष्टपणे नमुद करावीत. तसेच शाळा समितीने याबाबतचे अभिलेख जतन करुन ठेवणे अनिवार्य राहील.**

**११. निवडीबाबत अडचणी असल्यास संबंधित विभागाच्या विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे लेखी निवेदन करता येईल.**

**इ) मुलाखतीसह पदभरतीसाठी राज्यातील खाजगी व्यवस्थापनाकरीता मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी वेळापत्रक :-**

१. मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरिता राज्यस्तरावरुन दिनांक १३/९/२०२१ ते दिनांक १४/१०/२०२१ या कालावधीचे वेळापत्रक निश्चित करण्यात येत आहे.

२. मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी व्यवस्थापनाकडील पोर्टलवर दिलेल्या रिक्त पदांच्या जाहिरातीनुसार येणारे उमेदवार विचारात घेता व्यवस्थापनाला आपल्यास्तरावरुन एक किंवा अधिक पॅनेल तयार करुन मुलाखत व अध्यापन कौशल्याची कार्यवाही पुर्ण करता येईल. यासाठी तज्ज्ञांचा आवश्यकतेनुसार समावेश करावा.

३.राज्यातील कोविड-१९ ची परिस्थिती,पूरपरिस्थिती इत्यादी नैसर्गिक आपत्ती,महिला,दिव्यांग उमेदवार यांना करावा लागणारा राज्यभराचा प्रवास इत्यादी बाबी विचारात घेता व्यवस्थापन व उमेदवारांच्या सोईनुसार **"मुलाखत व अध्यापन कौशल्य" ऑनलाईन/ऑफलाईन** पध्दतीने पूर्ण करावे.

४.राज्यातील कोविड-१९ ची परिस्थिती,पुरपरिस्थिती इत्यादी नैसर्गिक आपत्ती विचारात घेता व्यवस्थापनाकडे मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी निवडलेल्या सर्वच उमेदवारांना सहभागी होता येईल यादृष्टीने योग्य ते नियोजन व्यवस्थापनाने आपल्या स्तरावरुन करावे.

५. व्यवस्थापनाकडे मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी निवडलेल्या सर्वच उमेदवारांना आपल्यास्तरावरुन ईमेल/मोबाईल (एसएमएस) इत्यादी माध्यमाद्वारे विहित मुदतीत ऑनलाईन घेण्यात येत असल्यास मुलाखतीसाठी लिंक,मुलाखतीचा दिनांक व वेळ तसेच ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येत असल्यास मुलाखतीचे ठिकाण,मुलाखतीचा दिनांक व वेळ इत्यादीबाबत कळवावे,जेणेकरुन सर्वच निवडपात्र उमेदवार मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी सहभागी होतील.

६. बहुतांश उमेदवार एका पेक्षा अधिक व्यवस्थापनाकडे मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी निवडले जाणार आहेत. अशा उमेदवारांपैकी काही उमेदवारांना एकाच वेळी दोन अथवा अधिक व्यवस्थापनाकडे मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी उपस्थित रहावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. या व अशा अन्य प्रकारच्या अपवादात्मक परिस्थितीमध्ये उमेदवाराची येणारी विनंती विचारात घेवून संबंधितांच्या मुलाखत व अध्यापन कौशल्याच्या वेळापत्रकामध्ये आवश्यक तो बदल करावा,जेणे करुन सर्वच निवडपात्र उमेदवारांना संधी उपलब्ध होईल.

**फ) उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी/पडताळणी :-**

पवित्र पोर्टलमार्फत मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी निवडलेल्या उमेदवारांची शैक्षणिक,व्यावसायिक अर्हतेची व इतर आवश्यक कागदपत्रे ईमेल/पोष्ट/प्रत्यक्ष द्वारे प्राप्त करुन पडताळणी करावी. कागदपत्र पडताळणीच्या वेळी व नियुक्तीच्या वेळी मूळ कागदपत्रांची पडताळणी

करण्यासाठी संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील. उमेदवारांची स्वप्रमाणपत्र व शिफारस केलेल्या पदासाठी प्रत्यक्ष मुलाखत व अध्यापन कौशल्याच्या कार्यवाहीमध्ये शिक्षणाधिकारी अथवा त्यांचा प्रतिनिधी यांचा कोणताही सहभाग राहणार नाही.

अंतीम निवड झालेल्या उमेदवारांची सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे प्रत्यक्ष पडताळूनच नियुक्तीची कार्यवाही करावी.

मुलाखत व अध्यापन कौशल्यासाठी निवडलेल्या उमेदवारांचे पोर्टलवरील स्वप्रमाणपत्र (प्रोफाईल) संस्थेच्या लॉगीनवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

उमेदवारांनी स्वप्रमाणीत केलेली माहिती तपासण्यासाठी व्यवस्थापनाने खालील प्रमाणे कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी/पडताळणी करावी. उमेदवाराने पवित्र पोर्टलवर भरलेले स्वप्रमाणपत्राची प्रत.

१. अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा गुणपत्रक.(नसल्यास स्वप्रमाणपत्रातील गुण विचारात घ्यावेत.)
२. शालांत परीक्षा प्रमाणपत्र.(जन्म तारखेसाठी)
३. उच्च माध्यमिक परीक्षा गुणपत्रक व प्रमाणपत्र.(डी.एड./डी.एल.एड अर्हतेच्या पदासाठी)
४. डी.एड./डी.एल.एड गुणपत्रक व प्रमाणपत्र. (लागू असल्यास)
५. शिक्षक पात्रता परीक्षा गुणपत्रक व प्रमाणपत्र.( TET Paper-1, Paper-2, CTET Paper-1, Paper-2 ) (लागू असल्यास)
६. पदवी परीक्षा गुणपत्रक (अंतिम वर्षाचे बंधनकारक) व पदवी प्रमाणपत्र. (लागू असल्यास)
७. व्यावसायिक अर्हतेसाठी बी.एड./बी.पी.एड.(शारीरिक शिक्षकांसाठी)/एम.पी.एड.(शारीरिक शिक्षकांसाठी) परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र.
८. अ) उमेदवारांची निवड अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब),भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास प्रवर्ग(SBC), इतर

मागासवर्ग(OBC), या प्रवर्गातून झाली असल्यास अशा उमेदवारांकडून सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी व्यवस्थापनाने करावी.

ब) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित जमाती (पेसा) या प्रवर्गातील उमेदवारांना उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) सादर करण्याची आवश्यकता नाही. .

क) विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब),भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास प्रवर्ग (SBC) , इतर मागासवर्ग(OBC) व खुला (महिला) या प्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेल्या उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) सादर करणे आवश्यक राहिल. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी. .

ड) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (EWS) उमेदवारांसाठी Non Creamy Layer Certificate ची आवश्यकता नाही, तथापि त्यांचेसाठी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले EWS प्रमाणपत्र आवश्यक राहील. .

इ) ज्या व्यवस्थापनाच्या जाहिरातीध्ये अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) या प्रवर्गातील रिक्त जागा असतील, अशा व्यवस्थापनांनी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे अधिवास, जिल्हयातील पेसा क्षेत्रांतर्गत असल्याची खात्री करुन पात्र असणा-या उमेदवारांचा अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) या प्रवर्गाच्या नियुक्तीसाठी विचार करावा.

९. जात वैधता प्रमाणपत्र.

१०. समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्याबाबतचा पूरावा.

११. अधिवास प्रमाणपत्र. (Domicile Certificate) (लागू असल्यास)

१२. उमेदवाराच्या नावात बदल असल्यास त्याबाबतचा पूरावा.

**ग) महिलांसाठीचे आरक्षण :-**

१. महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय महिला व बालविकास विभाग, क्र.८२/२००९/मसआ२०००/प्रक्र४१५,का,दिनांक २५/०५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२. महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरीता महिला उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारपणे रहिवासी असावा.व्यवस्थापनाने त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्राची पडताळणी करावी.

३. अमागास/खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांसाठी दावा करणाऱ्या अराखीव/खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) पडताळण्याची कार्यवाही व्यवस्थापनाने करावी.

**ह) पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षण :-**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पअंक-२००९/प्रक्र२००/२००९/१६-अ,दिनांक २७/१०/२००९ अन्वये ‘‘सुशिक्षित बेराजगारांना अर्थसहाय्य’’ या योजने अंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये ३ वर्षा पर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकिय/निमशासकिय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० टक्के समांतर आरक्षण लागू आहे. अंशकालीन आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र पडताळणीसाठी व्यवस्थापनाकडे सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी.

**न) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांसाठी आरक्षण :-**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.भूकंप-१००९/प्रक्र२०७/२००९/१६-अ, दिनांक २७/०८/२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के समांतर आरक्षण व भूकंपग्रस्तांना २ टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र पडताळणीसाठी व्यवस्थापनाकडे सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी.

**प) संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ मधील तरतुदीनुसार शासनाने वेळोवेळी आवश्यक ठरवलेली संगणक अर्हता उमेदवारांनी धारण करणे आवश्यक आहे. संगणक हाताळणी/वापराबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र पडताळणीसाठी व्यवस्थापनाकडे सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी.

**म) ओळखपत्राबाबत :-**

कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराने स्वतःच्या ओळखीच्या पूराव्यासाठी स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, ड्रायविंग लायसन्स, महाविद्यालयात शिकत असल्याबाबतचे ओळखपत्र इत्यांदीपैकी किमान एक ओळखपत्र सोबत बाळगावे. व्यवस्थापनाने उमेदवाराच्या ओळखीबाबत उपरोक्त कागदपत्राच्या आाधारे खात्री करावी.

**र) दिव्यांग व्यक्ती असल्याचा पूरावा :-**

अ) अपंगव्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) नियम १९९५ व तद्नंतर या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार व विहित केलेल्या पध्दतीनुसार तसेच शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.अप्रकी-२०१२/प्रक्र२९७/आरोग्य ६, दिनांक ६/१०/२०१२ अन्वये शासनाने निर्गमित केलेल्या निर्णयानुसार (Software for Assessment of Disability Maharashtra-SADM) या नविन संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र या प्रवर्गात निवड झालेल्या उमेदवारांनी सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी.

ब) दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा व दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र पडताळणीसाठी व्यवस्थापनाकडे सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी.

क) दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी वेळी याबाबतची खात्री करावी.

**य) माजी सैनिक असल्याचा पुरावा :-**

अ) माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी.

ब) माजी सैनिक उमेदवाराने (अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व अनुसूचित जमाती पेसाक्षेत्र वगळून) आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधीत प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणे माजी

सैनिकांनाही सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) सादर करावे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी. .

**व) अमागास महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा :-**

अ) महिलांसाठी आरक्षीत पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांचा निवड सूचिमध्ये समावेश असल्यास अशा महिला उमेदवारांना महाराष्ट्राचे अधिवासी असल्याचे तसेच उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी.

**श) खेळाडूंसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा दावा :-**

अ) अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठीच्या आरक्षित पदांवर निवड सूचीमध्ये समावेश असलेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदाने केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने सदरचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करावी.

ब) अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठीच्या आरक्षित पदांवर निवड सूचीमध्ये समावेश असलेल्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे पडताळणी पूर्वी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अथवा सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. व्यवस्थापनाने प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी वेळी याबाबतची खात्री करावी.

क) खेळाडूंसाठीच्या आरक्षित पदांवर निवड सूचीमध्ये समावेश असलेल्या उमेदवारांना शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक १/७/२०१६ व १८/८/२०१६ मधील क्रीडा विषयक आरक्षणाच्या तरतुदी लागू राहतील. व्यवस्थापनेने याबाबतची खात्री करावी.

**ल) विवाहित स्त्रीयांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा**

विवाहित स्त्रीयांना विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला,स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा नावात बदल झाल्या संबंधी अधिसूचित केलेले राजपत्र संबंधित उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी व्यवस्थापनेकडे सादर करावे. व्यवस्थापनेने याबाबतच आवश्यकतेनुसार पडताळणी करावी.

------oo------